**नियमित दिवाणी दावा क्र.२०२/१५ नि. ४८ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज हा उलट मागणी दाव्यातील प्रतिवादी यांनी आपली कैफियत सादर करण्यास झालेला विलंब क्षमापीत होवून कैफियत उलट मागणी दाव्यात समाविष्ट करुन घेण्यासाठी सादर केला आहे. त्यांनी असे नमदू केले की फेब्रुवारी २०१६ मध्ये त्याच्या नोकरीच्या ठिकाणी त्याला मोठा अपघात झाला आणि दोन्ही पायांच्या हाताजवळ अपघातामुळे अनेक फ्रॅक्चर झाले. त्यामुळे त्याला सुमारे २ वर्ष विश्रांती घ्यावी लागली. तदनंतर कोरोनामुळे त्याला न्यायालयात उपस्थित राहता आले नाही. अशा परिस्थीतीत कैफियत दाखल करण्यासाठी झालेला विलंब क्षमापित करुन उलट मागणी दाव्याच्या कामी कैफियत समाविष्ट करुन घ्यावी अशी मागणी त्यांनी केली.

२. या अर्जाला प्रतिवादी यांच्याकडून हरकत घेण्यात आली असून सदरचा अर्ज मान्य नसून त्यास कोणतेही संयुक्तीक काराण नसल्यामुळे तो अर्ज नामंजूर करावा अशी मागणी त्यांनी केली आहे.

३. उभय पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला. वादीच्या अर्जातील कथनांचा विचार केला असता त्याला अपघातामुळे दाव्याच्या कामकाजात येता आले नाही असे दिसून येते. त्याचप्रमाणे कोरोनामुळे न्यायालयाचे दैनंदिन कामकाज विस्कळीत झाले होते ही गोष्ट सर्वमान्य आहे. अशा परिस्थीतीत नैसर्गीक न्याय तत्वाचा विचार करता वादी यास उलट मागणी दाव्यासाठी बाजू मांडायला संधी देणे मला न्यायोचित वाटते. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करतो–

१ अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींची कैफियत दाव्याच्या कामी वाचण्यात येते.

VINAYAK DATTATRAY PATIL
Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2022.04.08 11:14:09 +0530

आटपाडी (वि. द. पाटील )

दि. ७.४.२०२२ दिवाणी न्यायाधीश क.स्तर आटपाडी

(CNRMHSN110007722015)

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - H.P.Haridas
Court - Civil Judge Jr.Dn. Atpadi.
Date - 07.04.2022
Order signed by the
Presiding Officer on - 07.04.2022
Order uploaded on - 08.04.2022